करोना 2020/सुचना/आदेश क्रमांक - 125

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड402201
❖दुरध्वनीक्र:02141-222118/222097/222322❖फॅक्सक्र:02141-227451❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक :साशा/कार्या/ब-5/करोनाविषाणु/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दिनांक : 24 /03/2020

प्रति,

**तातडीचे**

1. जनरल मॅनेजर, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड अलिबाग.
2. सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग, कोंकण भवन, नवि मुंबई
3. कामगार उपायुक्त, पनवेल
4. मॅनेजर, लिड बँक, रायगड
5. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था रायगड अलिबाग

**विषय :- करोना विषाणु (COVID 19) या विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करणेबाबत.**
**उपस्थितीची नोंद घेण्यासाठी वापरणेत येणारी बायोमेट्रीक प्रणाली पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवणेबाबत.**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दिनांक 13/03/2020, दि. 14/3/2020, दि. 15/3/2020

जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणु संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केलेला आहे. त्याअनुषंगाने करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखणेच्या अनुषंगाने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने आपणांस सूचित करणेत येते की, करोना विषाणुचे संक्रमण रोखण्यासाठी आपले कार्यक्षेत्रातील कंपन्या, उद्योग, बँका, खाजगी आस्थापना व सोसायटीमधील अधिकारी / कर्मचारी तसेच कामगार यांचे कार्यालयीन उपस्थितीची नोंद घेण्यासाठी वापरण्यात येणारी बायोमेट्रीक प्रणाली पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयात सादर करावा.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी रायगड**